# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : ८०८/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.जयंत रा. बरेगार
फ-५, निमिष प्लाझा, कंटक पाणंट
सालईवाडा, सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग ४१६ ५१०

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी
तलाठी सजा गोठोस यांचे कार्यालय
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी
तलाठी सजा गोठोस यांचे कार्यालय
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १७/६/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३१/१२/२०२१ | ---- | २३/२/२०२२ | २/५/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.८/८/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १७/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता गुगलमीट व्दारे ऑनलाइन उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अनिल रामचंद्र राणे, तलाठी गोठोस उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *तलाठी गोठोस, ता.कुडाळ या पदाची माहे ऑक्टो २०१७ ते नोव्हेंबर २०१७ तसेच ऑक्टो २०२१ ते नोव्हे २०२१ या कालावधीची शासकीय दैनंदिनी मिळण्याबाबत व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२/५/२०२२ रोजी, "*विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी गोठोस श्री.अनिल रामचंद्र राणे अपिलार्थी हा निर्णय मिळालेपासून १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागीतलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोच डाकेने विनामुल्य पुरवावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि.२१/१/२०२२ च्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी रजिस्टर पोस्टेज खर्च रू.२५/- व माहिती पाठविण्यासाठी रू.२५/- असे एकूण ५० रूपये पोस्टेज खर्च या कार्यालयाकडे मनी ऑडरव्दारे पाठविण्यात यावा म्हणजे माहिती पाठविणे सोयीस्कर होईल. त्यानंतर शुल्काचा भरणा झाल्यावर दि.११/२/२०२२ च्या पत्राव्दारे तक्रारकर्ता यांना अशी माहिती देण्यात आली की, तलाठी गोठोस पदाची शासकीय दैनंदिनी ही वैयक्तिक स्वरूपाची माहिती आहे. माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (जे) नुसार अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली आहे. त्यामुळे अशी माहिती देता येत नाही.

याविरूध्द करण्यात आलेल्या प्रथम अपीलात, प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मंडळ अधिकारी माणगांव यांनी तक्रारकर्ता यांना १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश दिले. त्यांनी त्यांचे आदेशात असेही नमूद केले की, कर्मचाऱ्यांची दैनंदिनी ही माहिती अधिकार अधिनियमाचे कलम २ (च) नुसार माहिती व्याख्येत मोडते ही माहिती वैयक्तिक असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अयोग्य आहे.

प्रथम अपील आदेशानंतर दि.१९/५/२०२२ च्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की, त्यांनी मागितलेली माहिती दफ्तरी उपलब्ध नसल्याने माहिती देता येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने व्यथित होऊन सदरची तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. या प्रकरणाच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यांना दोनवेळा माहिती पुरविलेली आहे. तथापि दोन्ही वेळी माहिती नाकारताना त्यांनी वेगवेगळी कारणे दिलेली आहे. प्रथमत: ते असे म्हणतात की, शासकीय कर्मचाऱ्यांची दैनंदिनी ही त्याची वैयक्तिक माहिती असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या अपवादामध्ये मोडते त्यामुळे ती देता येत नाही. त्यानंतर प्रथम अपील आदेशानंतर माहिती देण्याचे आदेश दिल्यावर कळविले की, सदरची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्धच नाही. या ठिकाणी प्रश्न असा उपस्थित होतो की, मूळात जी माहिती तलाठी कार्यालयात उपलब्ध नव्हतीच ती वैयक्तिक स्वरूपाची आहे अशी दर्शवून नाकारण्याचे काय कारण होते. प्रथमताच जन माहिती अधिकारी असे कळवू शकले असते की, तक्रारकर्ता यांनी ज्या कालावधीची दैनंदिनीची माहितीची मागणी केलेली आहे त्या कालावधीची दैनंदिनी त्यांनी लिहीलेलीच नाही. तथापि त्यांनी तसे तक्रारकर्ता यांना कळविलेले नाही. दोन वेगवेगळया वेळी माहिती नाकारताना वेगवेगळी कारणे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. यामुळे जन माहिती अधिकाऱ्याचे एकूणच वर्तन संशयास्पद असल्याचे दिसून यते. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी होणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. श्री.अनिल रामचंद्र राणे, तालाठी गोठोस यांनी तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती नाकारताना दोन वेगवेगळे कारणे देण्याची त्यांची कृती ही संशयास्पद असल्याने त्यांनी असे करण्यामागचे कारण शोधण्यासाठी तहसिलदार कुडाळ यांनी स्वत: चौकशी करावी व याबाबतचा सविस्तर अहवाल आयोगास पुढील सुनावणीस सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२८/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ जून, २०२५ .

**आदेशातील मुद्दा क्र.१ च्या अनुपालनार्थ प्रत रवाना,**
तहसिलदार कुडाळ,
तहसिलदार कार्यालय कुडाळ,
ता.कुडाळ जि.सिंधुदूर्ग